**<u>प्रतिवादी क्र.२ तर्फे श्री.उप्पे वकिल यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

**२१.** हे खरे की, मी इंग्रजीमध्ये सही करतो. मला मराठी भाषा लिहिता-वाचता येते हे खरे आहे. गट क्र.२६१/३/४ मधील १ हेक्टर ८१ आर क्षेत्र हे माझ्या आईच्या नावे आहे हे खरे आहे. हे खरे की, ही मिळकत माझ्या आईच्या नावे वडिलांनी करुन ठेवलेल्या मृत्युपत्राच्या आधारे आलेली आहे. हे खरे की, मृत्युपत्राच्या आधारे फेरफार उतारा तयार करुन माझ्या आईने गट क्र.२६१/३/४ यास स्वत:चे नावे लावून घेतले. मला एक भाऊ आणि चार बहिणी आहेत.

**२२.** हा दावा मी वाचला आहे व त्यातील मजकुर मला माहिती आहे. हे खरे की, दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे दि.२५/०६/२०१५ रोजीच्या खरेदीपत्राने आली. हे खरे नाही की, या मिळकतीच्या ग्रामपंचायत पत्रकी प्रतिवादी क्र.१ चे नाव आहे. वादीने मृत्युपत्राच्या आधारे तिला आलेल्या जमिनीचे तिने खरेदीपत्र तिने करुन दिलेले आहे. ती खरेदीपत्रे मी या दाव्यात दाखल केली आहेत, हे खरे आहे. मी किंवा माझ्या भावडांनी या खरेदीपत्रांना अद्यापही हरकत घेतलेली नाही. हे खरे की, आजरोजी दावा मिळकती प्रतिवादी क्र.२ यांच्या नावे आहे. हे खरे की, मंचक बोंडगे यांच्यासोबत वादींनी खरेदी-विक्रीचा एकच व्यवहार केला. या व्यवहाराशिवाय या जमिनीचा आणखी व्यवहार झाला नाही, हे खरे नाही. हे खरे की, मंचक बोंडगे यांना खरेदीपत्र करुन देण्यापुर्वी माझ्या आईने एक खाजगी ले-आउट करुन घेतला होता. आता मला खाजगी ले-आउट दाखवला. या ले-आउटमधील प्लॉट क्र.१ हा मंचकला करुन दिलेल्या खरेदीपत्रातील मिळकत आहे. सदर ले-आउटला **<u>नि.क्र.८६</u>** देण्यात येते. हे खरे की, मंचक बोंडगे यांच्या खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्यावर माझ्या आईचा अंगठा आहे, हे खरे आहे. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ यांना खरेदीपत्र करुन देण्यापुर्वी मंचक बोंडगे यांना माझ्या आईने खरेदीपत्र करुन दिलेले होते. दावा मिळकतीच्या व्यवहाराशिवाय प्रतिवादी क्र.१ सोबत माझया आईचा अन्य व्यवहार झाला नाही, हे खरे आहे. आमचे प्लॉट आम्हाला मिळावेत अशी आमची मागणी आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या खरेदीपत्राचा मुद्रांक दि.२५/०६/२०१५ रोजी घेतला याबद्दल मला

माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले खरेदीपत्रामध्ये जो प्लॉट नमूद आहे, त्याचा खाजगी ले-आउटमधील क्र.२ आहे, हे खरे आहे. हाच प्लॉट प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला विकला याची मला माहिती नाही.

**२३.** आमच्या बहिण-भावांच्या वाटण्या झालेल्या नाहीत. हे खरे नाही की, खरेदीपत्राच्या दिवशीच प्रतिवादी क्र.२ ला प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीचा ताबा दिला. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यात काय व्यवहार झाला हे मला माहिती नाही, हे खरे आहे. मंचकला खरेदीपत्र करुन द्यायचे म्हणून संजयला घेवून गेले आणि संजयच्या नावे खरेदीपत्र केले असा दाव्यात उल्लेख आहे, हे खरे आहे. मंचकला दाव्यात पक्षकार केले नाही. माझ्या आईच्या नावे महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा किनगांव येथे खाते आहे. दि.०८/०४/२०१५ रोजी माझया आईच्या नावे संजय यांनी रुपये दहा लाख वर्ग केले आहेत, हे खरे आहे. मी सांगतो की, ते दुसऱ्या व्यवहाराचे आहेत. तो व्यवहार कोणता आहे याचा उल्लेख मी दाव्यात केला नाही. या दाव्यात न्यायालयाने मनाई हुकूम दिलेला नाही, हे खरे नाही. हे खरे की, दाव्यात माझी बहिण-भावंडे पक्षकार नाहीत. हे खरे की, वादीने प्रतिवादी क्र.१ व अन्य लोकांविरुध्द फौजदारी खटला या दावा मिळकतीसंदर्भाने केला होता. हे खरे नाही की, दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ कडून प्रतिवादी क्र.२ ने खरेदी घेताना त्याबद्दल न्यायालयाचा मनाई हुकूम नव्हता. न्यायालयाचा मनाई हुकूम असल्याबाबतची कागदपत्रे आहेत. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ यांच्याशी वादीने केलेल्या व्यवहाराची माहिती फक्त वादीलाच आहे, मला नाही. हे खरे नाही की, मंचक याकामी आवश्यक पक्षकार आहे. हे खरे की, माझ्या शपथपत्रातील रेखार्कींत अ हा भाग बरोबर आहे. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या लाभात माझ्या आईने खरेदीपत्र करुन देण्यापुर्वी मंचक बोंडगे यांच्या लाभात याच मिळकतीचे खरेदीपत्र माझ्या आईने करुन दिले असल्याने प्रतिवादी क्र.१ च्या खरेदीपत्राच्या वेळी मंचक बोंडगे यांची गरज नव्हती. हे खरे की, रुपाली गुटे, कातखडे, नरहरी फड यांची जी खरेदीपत्रे मी दाव्यात हजर केली आहेत, ती स.क्र.२६१/३/४ मधील आहेत. हे खरे की, संमतीदार म्हणून या खरेदीपत्रांवर माझी किंवा माझ्या

भावडांची सही नाही. शपथपत्रातील कागदपत्रांच्या अनुषंगाने असलेला मजकुर वगळता बाकी सगळा मजकुर खोटा आहे, हे खरे नाही. अंबाजोगाई रस्त्यामुळे या जमिनींच्या किंमती वाढल्या आहेत, हे खरे आहे. हे खरे नाही की, त्यामुळेच हा दावा आम्ही दाखल केला. हे खरे नाही की, प्रतिवादीकडून पैसे उकळावेत म्हणून हा दावा केला. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ ला त्रास देण्यासाठी त्याला सामील केले आहे. प्रतिवादी क्र.२ याने प्रतिवादी क्र.१ कडून खरेदीपत्र करुन घेण्यापुर्वी मिळकतीची सर्व कागदपत्रे पाहिली होती, हे खरे नाही. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.२ साठी उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक:२४/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**